नि.दि.दावा क्र. ४८२/२०१९
गुरुनाथ व इतर वि. नरसिंग व इतर

## निशाणी क्र. २२ खालील आदेश
**( CNR NO.MHLA140012512019 )**

प्रस्तूत अर्ज हा प्रतिवादी क्र. १ ते ३ व ५ ते १० यांनी त्यांचे विरुध्द पारीत झालेला "विना कैफीयतचा" आदेश रद्द व्हावा यासाठी केलेला आहे. त्यावर वादीने निशाणी क्र. २२ वर दिलेले म्हणणे वाचले. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

२. प्रतिवादींच्या वकिलांनी असा युक्तीवाद केला की, प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादी क्र. १ ते ३ व ५ ते १० हे वयोवृध्द असून ते कोरोना रोगाच्या संसर्गामुळे व त्याच्या भीतीमुळे घराबाहेर पडु शकले नाहीत. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ ते ३ व ५ ते १० यांनी वेळेवर हजर होऊन जवाबदावा दाखल केला नाही म्हणून त्यांचे विरुध्द "विना कैफीयतचा" आदेश पारीत झाला आहे. म्हणुन त्यांनी झालेला विलंब माफ करुन कैफीयत स्वीकारण्याची विनंती केली आहे.

३. वादीच्या वकिलांनी सदर अर्जास म्हणणे देऊन कथन केले की, प्रतिवादींचे अर्जातील कारण हे अविश्वसनीय आहे व चुकीचे आहे. तसेच कोरोना रोगाचा प्रादुर्भाव कमी झालेला होता तरी सुध्दा त्यांनी जबाबदावा दाखल करण्यास विलंब केला. तसेच प्रतिवादी क्र. १० विरुध्द दिनांक १०.०३.२०२२ रोजी एकतर्फा आदेश पारित झाला आहे. त्यामुळे सदरचा मजकूर प्रतिवादी क्र. १० ला लागु होत नाही. तरी प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

४. दोन्ही बाजूंचे म्हणणे पाहिले. दिवाणी प्रक्रिया संहितेनुसार प्रत्येक दाव्यात गुणदोषावर चौकशी होणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक असते. अशा चौकशीसाठी पक्षकारांचे म्हणणे दाखल होणे व त्यांची योग्य बाजू मांडणे हे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक असते. त्यामुळे न्यायाच्या दृष्टीने नैसर्गिक न्याय तत्वाच्या आधारे प्रतिवादी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी मिळणे न्यायोचित आहे. सबब खालीलप्रमाणे आदेश.

**आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. १ ते ३ व ५ ते १० विरुध्द झालेला विनाकैफीयतचा आदेश त्यांनी वादीला प्रत्येकी रु.१००/– खर्च या अगर पुढील तारखेस देण्याच्या अटीवर रद्द करण्यात येतो.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by PRASAD DIPAK KOLEKAR
Date: 2023.04.12 17:38:24 +0530

औसा. **(पी.डी. कोळेकर)**

दिनांकः– १२/०४/२०२३ २रे सह दिवाणी न्यायाधिश, क.स्तर,औसा.